**महाराष्ट्र शासन**

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, दुसरा मजला फोर्ट

वाचा : या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एफएलआर ११२०१५/३२००/पाच (ब) दि. १७ जुलै, २०१५

विषय : बिअर साठयावर पुन:प्रक्रिया/ पुन:लेबलिंग व पुन:उर्ध्वपतन करण्याबाबत.

**परिपत्रक**

क्रमांक :एफएलआर ११२०१५/३२००/पाच (ब) मुंबई दि. ०९ जून. २०१६.

उपरोक्त नमूद केलेल्या परिपत्रकान्वये निर्माणीमध्ये उत्पादीत केलेले मद्य काही कारणास्तव वितरीत न झाल्यामुळे निर्माणीत पडून राहते किंवा वितरीत झालेल्या मद्याची प्रत किंवा गुणवत्ता खराब झाल्यामुळे मद्य निर्माणीत पुन्हा आणावे लागते. अशा मद्य साठयावर घटकाने केलेल्या विनंतीनुसार पुन:प्रक्रिया/पुन:लेबल/पुन:उर्ध्वपतन करण्याचे अधिकार जिल्हा स्तरावर प्रदान करण्यात आलेले आहेत. उपरोक्त परिपत्रकात फक्त विदेशी मद्याचा उल्लेख असल्याने बिअर संदर्भात अशी प्रकरणे उद्भवल्यास जिल्हास्तरावर परवानगी न देता या कार्यालयास प्रकरण सादर करण्यात येत असल्याचे दिसून येते. वास्तविक मुंबई विदेशी मद्य नियमावली, १९५३ मधील नियम ६ मधील तरतूदींनुसार विदेशी मद्याच्या व्याख्येमध्ये स्पिरीटस, वाईन, किण्वित मद्य (ale बिअर, पोर्टर, सायडर इ.), सौम्य मद्य चा अंतर्भाव आहे. त्यामुळे उपरोक्त सूचना बिअर करिता देखील लागू आहेत. तरीही जिल्हा अधीक्षकांना बिअरचा उपरोक्त परिपत्रकात समावेश आहे किंवा नाही याबाबत संभ्रम असल्याने यासंदर्भात पुन्हा स्पष्ट करण्यात येते की, दि. १७ जुलै. २०१५ च्या परिपत्रकीय सूचना बिअरला देखील लागू आहेत. त्यामुळे यापुढे बिअरसाठयावर पुन:प्रक्रिया/ पुन:लेबलिंग व पुन:उर्ध्वपतन करण्याबाबत जिल्हा स्तरावरुन परवानगी देण्यात यावी. अशी प्रकरणे यापुढे या कार्यालयास पाठविण्यात येऊ नयेत.

(विजय सिंघल)
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क.
महाराष्ट्र राज्य मुंबई.

प्रति,

१. सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
३. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
४. अभिलेख शाखा - प्रती.

प्रत. : माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

या कार्यालयातील उप संचालक (सांख्यिकी ) यांनी सदरचे परिपत्रक विभागाच्या संकेत स्थळावर अपलोड करुन घ्यावी.

( यतिन सावंत )
प्र.सह-आयुक्त (मळी व मद्यार्क)
आयुक्ताकरिता.